


झेपावलेले सोलापूर
सोलापूर तरुण भारत
४२वा वर्धापन दिन
रविवार, २ ऑगस्ट २०२६
१
बार्शी
माळशिरस
पंढरपूर
मोहोळ
उत्तर सोलापूर
दक्षिण सोलापूर
सांगोला
मंगळवेढा
अक्कलकोट





सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
Hotel Ambassador Executive
95/1, Murarji Peth, Near Old Pune Naka, S.T.Stand Road, Solapur
0217-2322388 M.: 9699066102

सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
सोलापूर जिल्हा शैक्षणिक कला शिक्षक संघ सोलापूर
सोलापूर जिल्हा शैक्षणिक कलाशिक्षक संघ, सोलापूर
द्वारा : धर्मण्णा सादूल प्रशाला, सोलापूर
शेरशहा डोंगरी राज्य अध्यक्ष
शालिग्राम भिरुड राज्य सचिव
शशिकांत मोटगी राज्य उपाध्यक्ष
शांतप्पा काळे राज्य सहसचिव
अनिल रॉय विभागीय उपाध्यक्ष
शशिकांत सदाफुले जिल्हाध्यक्ष
संतोष धारेराव जिल्हा सचिव
षण्मुखानंद दाते कार्याध्यक्ष
मदगोंडा बिराजदार जिल्हा ग्रामीण अध्यक्ष
सर्व पदाधिकारी, सदस्य, कलाप्रेमी शिक्षक बंधू भगिनी




तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा

तरुण भारत
जाहिरात आपली, सन्मान महाराष्ट्राचा
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
BALAJI SAROVAR PREMIERE solapur
A DIVISION OF BALAJI AMINES LIMITED
Solapur First World Class Luxury Destination
: Office :
9/1A/1, Aasra Chowk, Hotgi Road,
Solapur - 413 224
Ph. 0217-2310824 Web.: www.balajiamines.com




श्रद्धास्थान
दैनिक तरुण भारत
वर्धापन दिन निमित्त
हार्दिक शुभेच्छा
आ.सचिन कल्याणशेट्टी
विधानसभा सदस्य, अक्कलकोट
: शुभेच्छुक :
भारतीय जनता पार्टी, अक्कलकोट मध्य, उत्तर व दक्षिण मंडल

महाराष्ट्र ही संतांची भूमी आणि छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी म्हणून ओळखली जाते. या गौरवशाली इतिहासाची परंपरा आजच्या आधुनिक युगातही पुढे नेण्यासाठी आणि भारतीय संरक्षण दलात ग्रामीण भागातील हुशार, होतकरू व तरुण मुलांना संधी मिळावी, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्ह्यात एक सैनिकी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार, सोलापूर जिल्ह्याकरिता एकमेव अशी सैनिकी शाळा उभारण्याचे भाग्य मागास समाज सेवा मंडळाला लाभले.



# दलितमित्र कै. चंद्राम चव्हाण (गुरुजी): राष्ट्रसेवेचे ध्येय बाळगणारी आदर्श संस्था

## जवान जय किसान मुलांची सैनिकी शाळा व कनिष्ठ महाविद्यालय



● ऑब्स्टॅक्लस प्रात्यक्षिक



● जलतरण सराव



● बॉक्सिंग सराव



● रोप क्लाम्बिंग



**रवींद्र चव्हाण**
भ्र.-७५८८० ४८८५५

संस्थेचे अध्यक्ष दलित मित्र कै. चंद्राम चव्हाण गुरुजी यांनी १० जून २००४ रोजी नेहरूनगरच्या शिक्षण संकुलात मजय जवान जय किसान मुलांची सैनिकी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाची मुहूर्तमेढ रोवली. सुरुवातीपासूनच तळागाळातील विद्यार्थ्यांचा उद्धार आणि यशाची परंपरा सोबत घेऊन या शाळेने आपली यशस्वी वाटचाल सुरू ठेवली आहे. कै. गुरुजींच्या निधनानंतर आता सुभाष चव्हाण व इतर संस्था सदस्य ही धुरा समर्थपणे पुढे नेतात.

**शाळेचे स्थान व वैशिष्ट्ये:-**

सध्या ही शाळा सोलापूर येथील विजापूर रोडवरील नेहरूनगर परिसरात, श्री शिवाजी अध्यापक विद्यालयाच्या प्रांगणात (रोडलगत) सुरू आहे. हे स्थान सोलापूर बस स्टँडपासून साधारण ६ किमी आणि सोलापूर रेल्वे स्टेशनपासून साधारण ४ किमी अंतरावर आहे.

इंग्रजी भाषेचे वाढते महत्त्व ओळखून, इतर सैनिकी शाळा मराठी किंवा सेमी- इंग्रजी माध्यमाच्या असतानाही, कै. गुरुजींनी ही शाळा पूर्णपणे इंग्रजी माध्यमातून सुरू केली, जी त्यांच्या दूरदृष्टीची प्रचिती देते.

**शाळेची उद्दिष्टे व ध्येय:-**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी शाळा पुढील उद्दिष्टांवर काम करते. विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन व स्वयंशिस्त निर्माण करणे. राष्ट्रसेवा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रसंरक्षणाची जाणीव निर्माण करून प्रेरणा देणे. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी प्रवेश परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन करणे. विद्यार्थ्यांमध्ये एकसंघ भावना, शिस्त व नेतृत्व गुणांचा विकास करणे. शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकास साधून सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणे. सैनिकी, शिस्तप्रिय व मूल्याधिष्ठित शिक्षण देऊन महाराष्ट्राची सैनिकी परंपरा जोपासणे.

**महत्त्वाच्या यशस्वी घोडदौडी:-**

शाळेने आजवर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. टिळक विद्यापीठ, मराठा मंदिर, भारती विद्यापीठ परीक्षा आणि चित्रकला ग्रेड स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. एस.ओ.एफ. तर्फे घेतल्या जाणाऱ्या विज्ञान, गणित व इंग्रजी ऑलिम्पियाड परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली आहे.

ज्युडो कराटे आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये (मलेशिया, सिंगापूर, नेपाळ, ऑस्ट्रेलिया) विद्यार्थ्यांची निवड व यश. खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, सैपक टकरा व तलवारबाजी, थलेटिक्स यांसारख्या खेळांमध्ये विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांची निवड झाली असून महाराष्ट्र शासनाचे प्रोत्साहनपर अनुदान प्राप्त झाले आहे.

हॉर्स रायडिंग व जलतरण शिबिरांचे आयोजन. १२ वी नंतर विद्यार्थ्यांची विविध व्यावसायिक शाखांमध्ये गुणवत्ता यादीत व भारतीय सैन्य दलात निवड. २०१४ चा सोलापूर शहरातील मउपक्रमशील शाळाफ पुरस्कार प्राप्त. तसेच शाळेच्या शिक्षकांनी पी.एच.डी. आणि सेट परीक्षा उत्तीर्ण करून शैक्षणिक दर्जा उंचावला आहे.

**भविष्यातील योजना व सामाजिक बांधिलकी:-**

संस्थेच्यावतीने भविष्यात शाळेच्या नियोजित वास्तूचे बांधकाम पूर्ण करून शाळा तिथे नेण्याचा मानस आहे. डिजिटल युगाचे पाऊल ओळखून प्रत्येक वर्ग ई-क्लास करणे, १००% संगणक साक्षरता आणि एन.डी.ए., जे.ई.ई., सी.ई.टी. परीक्षांसाठी वर्षभर तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन देण्यास शाळा वचनबद्ध आहे. याशिवाय, शाळा सामाजिक बांधिलकी म्हणून नेहरूनगर व कमलानगर परिसरात स्वच्छता अभियान, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर, वृद्धाश्रम भेट, श्रमदान आणि वृक्षारोपण यांसारखे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेची आवड निर्माण करते.

**शाळेचे नियम व अटी:-**

सैनिकी शिक्षण हे अत्यंत शिस्तीचे आणि शारीरिक क्षमतेचे असल्याने, प्रवेशानंतर एखादा विद्यार्थी वैद्यकीयदृष्ट्या अपात्र आढळल्यास, ज्यामुळे त्याला सशस्त्र सेनेमध्ये प्रवेश मिळण्यास अडचण येऊ शकते, अशा विद्यार्थ्यांना शाळेत अभ्यासक्रम पूर्ण करण्याची परवानगी दिली जाईल. मात्र, अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या संभाव्य धोक्याची व आरोग्याची संपूर्ण जबाबदारी पालकांवर असेल. शिस्त, गुणवत्ता, क्रीडा नैपुण्य आणि देशप्रेमाचे बाळकडू देणारी मजय जवान जय किसान मुलांची सैनिकी शाळाफ ही सोलापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करणारी एक अग्रगण्य संस्था ठरत आहे.

(लेखक जय जवान जय किसान मुलांची सैनिक शाळा व ज्युनिअर कॉलेज सोलापूरचे प्राचार्य आहेत.)



---

## सारथी संडे इंग्लिश स्पीकर्स क्लब, सोलापूर

# इंग्रजी शिकविण्यापेक्षा आत्मविश्वास घडविण्याचा प्रेरणादायी प्रवास

एखादी कल्पना मनात जन्म घेते, तेव्हा ती किती दूरपर्यंत पोहोचेल, याची कल्पना सुरुवातीला कोणालाच नसते. माझ्याबाबतीतही तसेच झाले. दोन दशकांपूर्वी माझ्या मनात एकच प्रश्न सतत घोळत होता.आपल्या विद्यार्थ्यांना इंग्रजीचे ज्ञान आहे, पण ते आत्मविश्वासाने इंग्रजी का बोलू शकत नाहीत?

या प्रश्नाच्या उत्तराच्या शोधातून २००५ मध्ये भारतातील एकमेव अशा **सारथी संडे इंग्लिश स्पीकर्स क्लब**ची सोलापुरात स्थापना झाली. माझा उद्देश केवळ इंग्रजी अध्यापन हा नव्हता; तर विद्यार्थी, शिक्षक, युवक आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीला आत्मविश्वासाने संवाद साधता यावा, हा होता.

माझा नेहमीच असा विश्वास राहिला आहे की, भाषा ही केवळ शब्दांची मांडणी नसते; ती व्यक्तिमत्त्व घडविण्याचे आणि संधींची दारे उघडण्याचे सामर्थ्य असते. म्हणूनच सारथीमध्ये व्याकरणाबरोबरच पब्लिक स्पीकिंग, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, नेतृत्व गुण, सकारात्मक विचारसरणी आणि इतर सॉफ्टस्किल्सना ही तितकेच महत्त्व दिले जाते. त्यासाठी नियमितपणे ग्रामर गेम्स, वर्ड गेम्स, मॉक इंटरव्ह्यू सेशन्स, रोल प्लेज, सेमिनार व प्रेझेंटेशन कॉम्पिटिशन आयोजित करण्यात येतात.

सारथी संडे क्लबची आपल्या सभासदांमधून निवड करण्यात आलेली एक एक्झिक्युटिव्ह बॉडी दर सहा महिन्यांसाठी कार्यरत असते. सध्या ३७ व्या एक्झिक्युटिव्ह बॉडीचे कार्य शिवलीला कुरणे यांच्या अध्यक्षतेखाली कुशलपणे चालू आहे.

गेल्या २१ वर्षांमध्ये दहा हजारांहून अधिक विद्यार्थी, शिक्षक, व्यावसायिक आणि विविध क्षेत्रांतील व्यक्तींनी सारथीच्या माध्यमातून इंग्रजी बोलण्याचा आत्मविश्वास मिळवला. त्यांच्या यशामध्ये आमचे योगदान असेल, ही भावना माझ्यासाठी कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठी आहे.

या प्रवासात अनेक उपक्रम जन्माला आले. 'द बेस्ट इंग्लिश टीचर अवॉर्ड्स', 'द बेस्ट सारथीयन ऑफ द इयर', 'द आऊटस्टँडिंग अचिव्हमेंट अवॉर्ड्स', 'द यंगेस्ट सारथीयन अवॉर्ड्स', इंग्लिश स्पेलिंग अँड ग्रामर स्पर्धा, स्पेलिंग बी स्पर्धा, विद्यापीठस्तरीय इंग्लिश प्रोफिशियन्सी टेस्ट, 'झेस्ट- द इंग्लिश कॉम्पिटिशन', 'सॅटरडे इंग्लिश स्पीकर्स क्लब', 'सिंप्लिफाइड इंग्लिश स्पेलिंग सेशन्स' ,'इंग्लिश आपल्या दारी' आणि वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी सुरू केलेला ' सारथी रीडस्'. तसेच विविध महाविद्यालयांशी इंग्लिश प्रशिक्षणासाठी केलेले सामंजस्य करार (MoUs) हे सर्व उपक्रम एका ध्येयातूनच जन्माला आले. इंग्रजी शिकण्याची संस्कृती निर्माण करणे.

**सारथीने घडविलेली माणसे- आमची खरी संपत्ती**



**प्रा. विठ्ठल वंगा, संस्थापक**
भ्र.-९८९०९२५९९६

कोणत्याही संस्थेची खरी ओळख तिच्या इमारतींमुळे किंवा पुरस्कारांमुळे होत नाही; ती घडविलेल्या माणसांमुळे होते. सारथीच्या प्रवासात अशा असंख्य प्रेरणादायी यशोगाथा घडल्या आहेत. त्यापैकी श्री भीमराव गुंडे सर यांची कथा विशेष प्रेरणादायी आहे.

शिक्षक म्हणून निवृत्त झाल्यानंतर वयाच्या ६२ व्या वर्षी त्यांनी सारथीमध्ये प्रवेश घेतला! त्यावेळी त्यांचे शिक्षण HSC, D.Ed. इतकेच होते. सारथीमध्ये इंग्रजीची प्रचंड आवड निर्माण झाल्यानंतर त्या वयात त्यांनी मुक्त विद्यापीठातून इ. (English) आणि त्यानंतर च.. (English) पूर्ण केले! पुढे त्यांनी स्वतः इंग्लिश शिकवण्यास सुरुवात केली. गंडे सरांनी आपल्या या अभूतपूर्व शैक्षणिक प्रवासाचे संपूर्ण श्रेय सारथीला दिले.

याचप्रमाणे मोटिव्हेशनल स्पीकर प्रमोद कानडे सर, सारथीचे पहिले अध्यक्ष ॲड. गणेश कटारे, न्यायाधीश म्हणून कार्यरत श्री चंदन काशिद सर, वयाच्या सत्तराव्या वर्षातही शिकण्याचा उत्साह जपणाऱ्या प्रा. डॉ. मयुरा शहा, आज वरिष्ठ महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत प्रा. डॉ. नागेश खराडे, मार्केटिंग क्षेत्रातील श्रीशैल मसुते, डॉ. प्रियांका गोटीपामूल, टेक्नोसॅव्हि इंजिनीयर नागेश पाथरूट, इंडियन एअरफोर्स मध्ये कार्यरत अमर गाजूल आणि गोपाळ पाथरुट आणि अशा शेकडो सारथीयन्सनी आपल्या-आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या सर्वांच्या यशोगाथा एकच गोष्ट सांगतात- सारथी केवळ इंग्रजी शिकवत नाही; ती आत्मविश्वास जागवते, व्यक्तिमत्त्व घडवते आणि आयुष्याला नवी दिशा देते.

या वाटचालीत अनेक शिक्षक, सहकारी, पालक, विद्यार्थी, मित्र आणि हितचिंतकांनी साथ दिली. सारथी आज जे काही आहे, ते त्यांच्या विश्वासामुळे आणि सहकार्यामुळे आहे. त्यामुळे हा प्रवास माझा एकट्याचा नसून, हजारो सारथीयन्सचा सामूहिक प्रवास आहे.

आज शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाच्या युगात प्रभावी इंग्रजी संवादकौशल्य ही जीवनावश्यक गरज बनली आहे.

किंबहुना इंग्लिश चे महत्त्व आणखी वाढले आहे. त्यामुळे येत्या काळात सारथीचे कार्य अधिक व्यापक करण्याचा आमचा प्रयत्न राहील. शाळा, महाविद्यालये, उद्योगविश्व आणि समाज यांच्यामध्ये इंग्रजी संवादकौशल्याची चळवळ अधिक बळकट करण्याचे आमचे स्वप्न आहे.

**माझा आजही तोच विश्वास आहे-**

इंग्रजी ही काही मोजक्या लोकांची भाषा नाही; ती शिकण्याची तयारी असलेल्या प्रत्येकाची भाषा आहे. जर एखाद्या विद्यार्थ्याच्या मनातील भीती दूर झाली, एखाद्या शिक्षकाला नव्या उमेदीने अध्यापन करता आले किंवा एखाद्या युवकाला आत्मविश्वासाने मुलाखतीला सामोरे जाता आले, तर मला वाटते सारथीचे कार्य सार्थकी लागले.

Master English, Master the World AmU We Build Confidence ही आमची केवळ ब्रीदवाक्ये नाहीत; तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेल्या आमच्या सकारात्मक प्रतिज्ञा आहेत.

सारथीच्या या इंग्लिश भाषा विषयक चळवळीत यापुढेही अनेक सोलापूरकर जोडले जातील असा मला दृढ विश्वास वाटतो.

Master ENGLISH & Master the WORLD



# सोलापुरची जैवविविधता आणि पर्यटन



## निसर्ग, इतिहास, अध्यात्म आणि लोकसंस्कृतीचा समृद्ध वारसा



सोलापूर शहर आणि जिल्हा म्हटले की सर्वप्रथम आपल्या डोळ्यांसमोर येतात ते श्री सिद्धेश्वर मंदिर, पंढरपूरची आषाढी वारी, अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ, सोलापुरी चादर, भुईकोट किल्ला आणि समृद्ध ग्रामीण संस्कृती. मात्र सोलापूरची ओळख केवळ धार्मिक, ऐतिहासिक किंवा औद्योगिक शहर म्हणून मर्यादित नाही. दख्खनच्या पठारावर वसलेल्या सोलापूर जिल्ह्याला एक वैशिष्ट्यपूर्ण नैसर्गिक संपदा लाभली आहे. गवताळ प्रदेश, माळराने, जलाशय, नद्या, शेती परिसंस्था, काटेरी व कोरडी पानझडी वनरचना, विविध वनस्पती, पक्षी, कीटक, सरपटणारे प्राणी आणि सस्तन प्राणी यांमुळे सोलापूर जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा जिल्हा आहे.

आज जगभरात जैवविविधता संवर्धन आणि शाश्वत पर्यटन यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पर्यटनाचा अर्थ केवळ एखाद्या स्थळाला भेट देणे एवढाच राहिलेला नाही. स्थानिक निसर्ग, संस्कृती, इतिहास, लोकजीवन आणि पर्यावरण यांचा अनुभव घेणे, त्यांचे संरक्षण करणे आणि स्थानिक समाजाच्या आर्थिक विकासाला चालना देणे, ही आधुनिक पर्यटनाची व्यापक संकल्पना आहे. या दृष्टीने पाहिले तर सोलापूर जिल्ह्यात जैवविविधता पर्यटन, पक्षी निरीक्षण, ग्रामीण पर्यटन, कृषी पर्यटन, पर्यावरण पर्यटन आणि धार्मिक पर्यटनाच्या विकासासाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

**भौगोलिक आणि पर्यावरणीय वैशिष्ट्येः–**

सोलापूर जिल्हा दख्खनच्या पठारावर वसलेला आहे. जिल्ह्याच्या अनेक भागांत तुलनेने कमी पर्जन्यमान असून हवामान उष्ण व कोरडे आहे. मात्र कमी पाऊस असणे म्हणजे जैवविविधता कमी असणे असे नाही. उलट, अशा कोरड्या प्रदेशात निसर्गाने विशिष्ट प्रकारची परिसंस्था निर्माण केली आहे. गवताळ प्रदेश, काटेरी झुडपे, कोरडी पानझडी वनरचना, शेतीची जमीन, नदीकाठ, तलाव आणि जलाशय हे सोलापूरच्या पर्यावरणाचे महत्त्वाचे घटक आहेत.

सोलापूरच्या माळरानाकडे अनेकदा ओसाड जमीन म्हणून पाहिले जाते. परंतु पर्यावरणीय दृष्टिकोनातून माळरान हे अत्यंत महत्त्वाचे अधिवास आहेत. या गवताळ प्रदेशांमध्ये विविध प्रकारची गवतवर्गीय वनस्पती, औषधी वनस्पती, फुलझाडे आणि झुडपे आढळतात. पावसाळ्यानंतर या प्रदेशात वनस्पतींची वाढ होते आणि त्यावर अवलंबून विविध कीटक, फुलपाखरे, मधमाश्या आणि पक्षी येथे येतात. या सर्वांवर अवलंबून असणारी अन्नसाखळी तयार होते. म्हणूनच गवताळ प्रदेश नष्ट झाल्यास केवळ एक–दोन प्रजातींचे नुकसान होत नाही, तर संपूर्ण परिसंस्थेवर परिणाम होतो. सोलापूरच्या जैवविविधतेचे संवर्धन करताना या माळरानांचे आणि गवताळ प्रदेशांचे महत्त्व समजून घेणे अत्यावश्यक आहे.

**नान्नज आणि माळढोक : सोलापूरची जागतिक पर्यावरणीय ओळखः–**

सोलापूर जिल्ह्याच्या जैवविविधतेचा उल्लेख करताना नान्नज आणि माळढोक पक्ष्याचा उल्लेख अनिवार्य आहे. माळढोक अर्थात Great Indian Bustard हा भारतातील अत्यंत दुर्मीळ आणि संकटग्रस्त पक्ष्यांपैकी एक आहे. त्याच्या संरक्षणासाठी नान्नज परिसरात अभयारण्याची निर्मिती करण्यात आली. मोकळे गवताळ प्रदेश, माळराने आणि पारंपरिक शेती क्षेत्र हे या पक्ष्याच्या अस्तित्वासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.



प्रा रेश्मा माने
भ्र.-८७८८१३९२२९

माळढोक हा मोठ्या आकाराचा पक्षी असून त्याची उंच मान, मजबूत शरीर आणि लांब पाय ही त्याची वैशिष्ट्ये आहेत. तो मोकळ्या गवताळ प्रदेशात वावरतो. सोलापूर जिल्ह्याला या दुर्मीळ पक्ष्याच्या अधिवासामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष पर्यावरणीय महत्त्व प्राप्त झाले आहे. माळढोकाबरोबरच या परिसरात काळवीट, लांडगा, कोल्हा, रानडुक्कर आणि विविध प्रकारचे शिकारी पक्षी आढळतात. गवताळ प्रदेशात घुबड, ससाणा, गरुड, चंडोल, लावा आणि इतर अनेक पक्षी दिसतात. त्यामुळे नान्नज परिसर हा जैवविविधता अभ्यास, पक्षी निरीक्षण आणि पर्यावरण शिक्षणासाठी अत्यंत उपयुक्त आहे. मात्र या परिसंस्थेसमोर अनेक आव्हाने आहेत. अधिवासाचे तुकडीकरण, अनियंत्रित बांधकाम, रस्ते, वीजवाहिन्या, शेती पद्धतीतील बदल आणि मानवी हस्तक्षेप यांचा वन्यजीवांवर परिणाम होतो. त्यामुळे विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखणे आवश्यक आहे.

**पक्षी निरीक्षणासाठी महत्त्वाचे केंद्रः–**

सोलापूर जिल्ह्यातील तलाव, जलाशय, नदीकाठ, शेती आणि गवताळ प्रदेश पक्ष्यांसाठी महत्त्वाचे अधिवास आहेत. स्थानिक पक्ष्यांबरोबरच हिवाळ्यात विविध स्थलांतरित पक्षी येथे येतात. तलावासह अनेक जलाशय पक्षी निरीक्षणासाठी उपयुक्त ठरू शकतात. पक्षी निरीक्षण हा आज जगभरातील लोकप्रिय निसर्ग पर्यटनाचा प्रकार आहे. सोलापूरमध्ये या पर्यटनाचा विकास केल्यास स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. युवकांना पक्षी ओळख, वनस्पती ओळख, निसर्ग मार्गदर्शन आणि पर्यावरण शिक्षणाचे प्रशिक्षण देऊन ङ्गनेचर गाईडफ म्हणून तयार करता येईल. पक्षी निरीक्षणासाठी येणाऱ्या पर्यटकांमुळे स्थानिक वाहतूक, निवास, स्थानिक खाद्यपदार्थ आणि हस्तकला यांना बाजारपेठ मिळू शकते. त्यामुळे जैवविविधता संरक्षण आणि स्थानिक अर्थव्यवस्था यांचा समन्वय साधता येईल.

**सोलापूर शहरातील शहरी जैवविविधताः–**

शहर म्हणजे केवळ इमारती, रस्ते आणि काँक्रीट नव्हे. शहरातही जैवविविधतेचे अनेक घटक असतात. उद्याने, तलाव, मंदिर परिसरातील जुने वृक्ष, शाळा–महाविद्यालयांचे परिसर, नदीकाठ, रस्त्यांच्या कडेला असलेली झाडे आणि मोकळे भूभाग हे शहरी जैवविविधतेचे महत्त्वाचे घटक आहेत. शहरातील मोठी झाडे पक्ष्यांना घरटी, कीटकांना अधिवास आणि नागरिकांना सावली देतात. झाडांमुळे शहरातील तापमान कमी होते, धूळ आणि प्रदूषण कमी होते आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. शहरात आढळणारे पक्षी, फुलपाखरे, मधमाश्या, खारी, सरडे, बेडूक आणि विविध कीटक हे शहरी पर्यावरणाच्या आरोग्याचे संकेतक आहेत. त्यामुळे शहर विकासाच्या आराखड्यात जैवविविधतेचा समावेश असणे आवश्यक आहे.

सोलापूर शहरात शहरी जैवविविधता उद्याने फुलपाखरू उद्याने, स्थानिक वनस्पती उद्याने आणि पक्षी निरीक्षण केंद्रे विकसित करता येऊ शकतात. शाळा–महाविद्यालयांमध्ये स्थानिक जैवविविधतेची नोंद करण्याचे प्रकल्प राबवता येतील.

**धार्मिक पर्यटनाचा समृद्ध वारसाः–**

सोलापूर जिल्ह्याची धार्मिक पर्यटन परंपरा अत्यंत समृद्ध आहे. सोलापूर शहरातील श्री सिद्धेश्वर मंदिर हे शहराचे सांस्कृतिक धार्मिक केंद्र आहे. मंदिर परिसर, तलाव आणि जुनी वृक्षसंपदा यांचे संवर्धन करून धार्मिक पर्यटनाला पर्यावरणीय पर्यटनाची जोड देता येईल.

अक्कलकोट हे श्री स्वामी समर्थ महाराजांच्या भक्ती परंपरेमुळे देशभर प्रसिद्ध आहे. अक्कलकोटमधील धार्मिक स्थळे, जुने वृक्ष, स्थानिक संस्कृती आणि ग्रामीण परिसर यांचा एकत्रित अनुभव पर्यटकांना देता येतो. पंढरपूर हे महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाचे धार्मिक पर्यटन केंद्र आहे. श्री विठ्ठल– रुक्मिणी मंदिर आणि चंद्रभागा नदी यांमुळे पंढरपूरचे धार्मिक आणि पर्यावरणीय महत्त्वही मोठे आहे. आषाढी आणि कार्तिकी वारीच्या काळात लाखो वारकरी पंढरपूरमध्ये येतात. या मोठ्या लोकसहभागाच्या यात्रेला पर्यावरणपूरक बनविण्याची मोठी संधी आहे. प्लास्टिकमुक्त वारी स्वच्छ चंद्रभागा, कचरा व्यवस्थापन, नदी संवर्धन आणि पर्यावरण जनजागृती यांचा वारीशी प्रभावीपणे संबंध जोडता येऊ शकतो. भक्ती आणि पर्यावरण संरक्षण यांचा संगम घडवून आणणे ही काळाची गरज आहे. पंढरपूर जवळ असणारे वेळापूर येथील प्रसिद्ध अर्धनारीनटेश्वर मंदिर आणि परिसर देखील पाहण्यासारखे आहे, बेगमपुर भीमा नदी आणि येथील किल्ला आणि परिसर देखील पुरातत्व अभ्यासासाठी जैवविविधता अभ्यास करण्यासारखा आहे .





**ऐतिहासिक पर्यटनः–**

सोलापूरचा इतिहास अत्यंत समृद्ध आहे. भुईकोट किल्ला, बाराकमानी, प्राचीन मंदिरे आणि इतर ऐतिहासिक वास्तू सोलापूरच्या इतिहासाची साक्ष देतात,त्याच बरोबर नव्याने प्रकाशझोतात आलेली आदिला नदी आणि परिसर देखील संवर्धन करून रिव्हर साईट सुशोभीकरण करता येऊ शकते. सोलापूर शहरातील भुईकोट किल्ला हा ऐतिहासिक वारशाचा महत्त्वाचा भाग आहे. ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन करताना त्याभोवतालची नैसर्गिक परिसंस्थाही जपणे आवश्यक आहे. किल्ले आणि ऐतिहासिक वास्तूंच्या परिसरात अनेकदा जुनी झाडे आणि विविध पक्षी आढळतात. इतिहास आणि जैवविविधता यांचा एकत्रित अनुभव देणारे हेरिटेज आणि नेचर वॉक आयोजित करता येतील. यामुळे पर्यटकांना इतिहासाबरोबरच त्या परिसरातील निसर्गाचीही माहिती मिळेल.

**ग्रामीण आणि कृषी पर्यटनः–**

सोलापूर जिल्हा शेतीप्रधान आहे. ज्वारी, डाळी, तेलबिया, फळबागा आणि विविध कृषी उत्पादनांमुळे ग्रामीण पर्यटनाच्या मोठ्या संधी आहेत. आजच पर्यटक केवळ पर्यटनस्थळ पाहू इच्छित नाही, तर स्थानिक जीवनाचा अनुभव घेऊ इच्छितो. शेतभेट, बैलगाडी सफर, पारंपरिक ग्रामीण भोजन, ज्वारीची भाकरी, सेंद्रिय शेती, शेततळे, पशुपालन, मधमाशी पालन आणि स्थानिक हस्तकला यांचा अनुभव पर्यटकांना देता येतो. कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांना शेतीबरोबर अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. आई कृषी पर्यटन केंद्राच्या माध्यमातून कृषी पर्यटन विकास करता येईल, महिला बचत गट, युवक आणि ग्रामीण उद्योजक यांना स्थानिक उत्पादने विक्रीची संधी मिळू शकते.याचे उत्तम उदाहरण म्हणजे पंढरपूर तालुक्यातील चिंचणी ग्रामपंचायत यांनी सुरुवात केलेली ग्राम पर्यटन होय.

**मधमाशी पालन आणि जैवविविधता पर्यटनः–**

सोलापूर जिल्ह्यात मधमाशी पालन हा पर्यावरणपूरक व्यवसाय म्हणून विकसित होऊ शकतो. मधमाश्या केवळ मध तयार करत नाहीत, तर त्या परागीभवनाच्या माध्यमातून शेती आणि जैवविविधतेसाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. मधमाशी पालन केंद्रांना पर्यटनाशी जोडून “Bee Tourism’ विकसित करता येऊ शकते. पर्यटकांना मधमाशी वसाहतींची माहिती, मध काढण्याची प्रक्रिया, मधाचे विविध प्रकार, मधमाशी पालनाचे प्रशिक्षण आणि स्थानिक मध उत्पादनांचा अनुभव देता येईल. यामुळे शेतकरी, महिला आणि ग्रामीण युवकांसाठी रोजगारनिर्मिती होईल आणि मधमाश्यांचे पर्यावरणीय महत्त्वही लोकांपर्यंत पोहोचेल.

**जलस्रोतांचे महत्त्वः–**

सोलापूरसारख्या कमी पर्जन्यमानाच्या जिल्ह्यात जलस्रोतांचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. तलाव, बंधारे, नद्या आणि जलाशय हे केवळ मानवी वापरासाठी नसून विविध पक्षी, मासे, उभयचर, जलवनस्पती आणि सूक्ष्मजीवांचे अधिवास आहेत. जलाशयांचे प्रदूषण झाल्यास संपूर्ण अन्नसाखळीवर परिणाम होतो. त्यामुळे जलपर्यटन विकसित करताना जलाशयाचे संवर्धन प्रथम आणि पर्यटन नंतर, ही भूमिका असावी. तलाव दत्तक योजना, जलाशय स्वच्छता, स्थानिक जैवविविधता नोंदणी आणि पक्षी निरीक्षण यांसारखे उपक्रम राबवता येतील.

**सोलापूरसाठी पर्यटन सर्किटची संकल्पनाः** सोलापूर जिल्ह्यात विविध पर्यटन सर्किट विकसित करता येतील.

**जैवविविधता पर्यटन सर्किट :**

सोलापूर – नान्नज – माळढोक अधिवास – संभाजी तलाव – सिद्धेश्वर वन विहार आणि स्मृती उद्यान परिसर ,इतर पक्षी निरीक्षण क्षेत्रे.

**धार्मिक पर्यटन सर्किट :** सोलापूर – अक्कलकोट – पंढरपूर – करमाळा – बार्शी.

**इतिहास पर्यटन सर्किटः** भुईकोट किल्ला– बाराकमानी– प्राचीन मंदिरे– ऐतिहासिक वास्तू.

**ग्रामीण पर्यटन सर्किटः** शेतभेट– ज्वारी संस्कृती– मधमाशी पालन– स्थानिक खाद्यसंस्कृती– ग्रामीण हस्तकला.

या सर्व पर्यटन प्रकारांना स्थानिक मार्गदर्शक, होमस्टे, स्थानिक खाद्यपदार्थ आणि स्थानिक उत्पादनांशी जोडल्यास पर्यटनाचा आर्थिक फायदा स्थानिक समाजाला मिळू शकतो.

**शाश्वत पर्यटनाची गरजः–**

पर्यटनामुळे निसर्गाचे नुकसान होता कामा नये. पर्यटन विकासासाठी पुढील बाबींना महत्त्व द्यावे लागेल.



प्लास्टिकमुक्त पर्यटनस्थळे, कचरा वर्गीकरण, पाणी बचत, सौरऊर्जेचा वापर, स्थानिक बांधकाम साहित्य, पर्यटकांची संख्या नियंत्रित करणे, वन्यजीवांना त्रास न देणे, स्थानिक समुदायाचा सहभाग, पर्यटनाचा अंतिम उद्देश केवळ पर्यटकांची संख्या वाढवणे नसून, निसर्गाचे संरक्षण आणि स्थानिक लोकांचा विकास हा असला पाहिजे.

**पुढील वाटचालः–**

सोलापूर जिल्ह्यात जैवविविधता पर्यटन नकाशा तयार करणे आवश्यक आहे. प्रख्यात पक्षी तज्ञ डॉ. सलीम अली यांनी गौरविलेल्या सोलापूर जिल्ह्याला राज्यभरातून पक्षी अभ्यासकांची ओघ असते.डॉ. सलीम अली यांनी सोलापूर शहरातील संभाजी (कंबर) तलाव तसेच शहरालगतच्या हिप्परगा तलाव, होटगी तलाव आणि नान्नज येथील माळढोक अभयारण्याला भेट देऊन पक्षिनिरीक्षण केले आहे.त्यावेळी असंख्य स्थलांतरित पक्षी शहरातील तसेच, शहरालगतच्या पाणस्थळांवर येत असल्याचे मत नोंदवून डॉ. अली यांनी सोलापूरला पक्ष्यांचे माहेरघर अशी उपाधी दिली होती. वर्षभर सोलापूर जिल्ह्यातील विविध नैसर्गिक ठिकाणी. नाना तऱ्हेचे पक्षी रुंजी घालत असतात; त्यामुळे सोलापूर जिल्हा पक्षी व पर्यावरण प्रेमींनी पंढरी केली आहे. जिल्ह्यात सुमारे २५० पेक्षा जास्त प्रजातीच्या पक्ष्यांची नोंद झाली आहे. त्यामुळे वर्षभर सोलापूर जिल्ह्यात पक्षी अभ्यासकांची वर्दळ असते. सोलापूर शहराला लागून असलेल्या बोलायची गावाच्या शिवारात अनेक माळावरचे पक्षी व वन्यजीव मुबलक आढळतात. या ठिकाणी वन विभागाने सुमारे अकरा चौरस किलोमीटर क्षेत्रात पर्यावरणप्रेमींसाठी नुकतेच ग्रासलँड सफारी सुरू करून पर्यटना व्यवसायाला चालना दिली आहे. जिल्ह्यातील महत्त्वाचे गवताळ प्रदेश, तलाव, नदीकाठ, वनक्षेत्रे, पक्षी अधिवास आणि जैवविविधता वारसा स्थळांची नोंद करावी. स्थानिक युवकांना नेचर गाईड, पक्षी निरीक्षक आणि पर्यावरण शिक्षक म्हणून प्रशिक्षण द्यावे. प्रत्येक गावात स्थानिक जैवविविधतेची नोंदणी करावी. एक गाव – एक जैवविविधता उद्यान ही संकल्पना राबवता येईल. शाळा–महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, वन विभाग, पर्यटन विभाग आणि स्थानिक नागरिक यांनी एकत्रितपणे काम केल्यास सोलापूर जैवविविधता संवर्धनाचे आदर्श मॉडेल बनू शकते.

सोलापूर शहर आणि जिल्हा हा निसर्ग, जैवविविधता, इतिहास, अध्यात्म, शेती आणि लोकसंस्कृती यांचा अद्वितीय संगम आहे. माळढोकाचा गवताळ अधिवास, स्थलांतरित पक्ष्यांचे जलाशय, शहरातील जुने वृक्ष, पंढरपूरची चंद्रभागा, अक्कलकोटची भक्ती, सिद्धेश्वराची परंपरा, भुईकोटचा इतिहास आणि ग्रामीण जीवनशैली– या सर्वांचा एकत्रित अनुभव म्हणजे सोलापूरचे खरे पर्यटन. सोलापूरच्या पर्यटनाचा विकास करताना निसर्गाचे संरक्षण, स्थानिक लोकांचा सहभाग आणि शाश्वत विकास यांना केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. जैवविविधता ही केवळ वन विभागाची किंवा पर्यावरणप्रेमींची जबाबदारी नाही; ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

**पर्यटक व पर्यटन स्थळांचे संवर्धनः–**

पर्यटकांनी पर्यटन स्थळांचे संवर्धन करायल पाहिजे. पर्यटन स्थळांना प्रदूषणाच्या विळख्यात आडकवण्यासाठी माणूसच अर्थात पर्यटकच जबाबदारी आहेत. वारे माप प्लास्टिकचे वापर, ध्वनी प्रदूषण.







राष्ट्रीय विचाराचे एकमेव दैनिक
सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
* शुभेच्छुक *
हॉटेल धनराज पॅलेस
परमिट बार अँन्ड बियर बार

धनराज गरड
व्हेज अँन्ड नॉनव्हेज रेस्टॉन्रट
बार्शी-सोलापूर रोड, वैंराग, ता.बार्शी, जि.सोलापूर

दैनिक सोलापूर तरूण भारतच्या
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...

ॲड. आल्हाद अंदोरे
सोलापूर जिल्हा आणि सत्र न्यायालय
मो.९८२३२२००९९

ॲड. अरविंद अंदोरे
मो.९७६५९८८८४४

ॲड. अथर्व अंदोरे
बॉम्बे हायकोर्ट आणि कोल्हापूर सर्किट बेंच
मो.८०५५८८८८४४
* शुभेच्छुक *
अंदोरे परिवार

प्रखर हिंदुत्ववादी राष्ट्रीय विचाराचे
'सोलापूर तरुण भारत'
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
* शुभेच्छुक *
लायन मोहन शंकरसा भूमकर
अध्यक्ष : लायन्स क्लब ऑफ सोलापूर
सिटी अध्यक्ष : सोलापूर जिल्हा तायक्वाँदो स्पोर्टस् कौन्सिल
अध्यक्ष : विणकर बाग मित्र मंडळ
संस्थापक सल्लागार : गुरुविद्या प्रतिष्ठान, सोलापूर
मो. 9422650750
भूमकर गारमेंट होलसेल दरात मिळेल.
गणेश पेठ, सोलापूर
मो. 8668124479 / 9021538073

सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

* शुभेच्छुक *
मा.उमाकांत तिपण्णा गायकवाड
खो-खो चे राष्ट्रीय प्रशिक्षक । सचिव : सोलापूर खो-खो असोसिएशन
खजिनदार : उत्कर्ष क्रीडा मंडळ, सोलापूर
सदस्य : जी.एम.मागासवर्गीय बहु.सामाजिक संस्था, सोलापूर
वरिष्ठ श्रेणी लिपिक : सो.म.पा.सर्वसाधारण सेवकांची सहकारी पतसंस्था.,सोलापूर

तरुण भारत
वर्धापनदिनाच्या
हार्दिक
शुभेच्छा

सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..
* शुभेच्छुक *

मा.राजू शेळके
आंतरराष्ट्रीय दिव्यांग क्रिकेट प्रशिक्षक

'सोलापूर तरुण भारत'
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

* शुभेच्छुक *
कल्याण करजगी
सोलापूर

दैनिक सोलापूर तरूण भारत वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा!
ना कोणत्या पक्षाचा...ना कोणत्या धर्माचा...महासंघ फक्त चालकांचा...
वाहतूक संघटना संयुक्त महासंघ
महाराष्ट्र राज्य
VAHTUK SNGHATNA SANYUKTA MAHASANGH
मुख्य कार्यालय : ३२ डी. दक्षिण सदर बाझार, मौलाली चौक, सोलापूर
महासंघ बिनव्याजी सोसायटी
पत्ता : कादरी हॉस्पिटलसमोर कुमठा नाका रोड, नई जिंदगी, सोलापूर

मा. रियाजभाई सय्यद
प्रदेश अध्यक्ष
शुभेच्छुक
वाहतूक संघटना संयुक्त महासंघ सर्व पदाधिकारी

प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक सोलापूर तरूण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
२० वर्ष यशाची, गौरवाची आणि ज्ञानदानाची...
उज्ज्वल यशाची परंपरा राखणारी सोलापुरातील अग्रगण्य अ‍ॅकॅडमी
कामतकर क्लासेस
बदल हा आपल्याच हातात आहे...
आताच भविष्याला आकार देऊया...
- इयत्ता २ री ते १० वी सेमी इंग्रजी आणि इंग्रजी माध्यम
- इयत्ता ५ वी ते १० वी CBSE
- इयत्ता २ री, ३ री, ४ थी, ६ वी आणि ७ वी MTS
- इयत्ता ५ वी आणि ८ स्कॉलरशीप
- इयत्ता ११ वी आणि १२ वी PCMB
- CET / NEET / JEE Preparation
- इयत्ता ८ वी, ९ वी आणि १० वी Foundation Course
- जुळे सोलापूर शाखेत विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी AC अभ्यासिका
- उत्कृष्ट निकालाची परंपरा

kamatkarclasses | kamatkarclasses | Web : www.kamatkarclasses.com

शाखा क्र. १: कामतकर क्लासेस, जुना एम्प्लॉयमेंट चौक, कामत हॉटेल मागे, सोलापूर
शाखा क्र. २: कामतकर अ‍ॅकॅडमी, वि. मो. मेहता शाळेजवळ, जुळे सोलापूर, सोलापूर
शाखा क्र. ३: कदम सरांची सुयोग अ‍ॅकॅडमी व कामतकर अ‍ॅकॅडमी, सम्राट चौक, नीलकंठ बँकेच्या मागे, सोलापूर, 9975962000, 9970609155
कामतकर सर, मोबा. 9822448890